कौशल्यम् बलम्

# कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

सन २०१४ पासून मा. पंतप्रधान यांच्या "**मेक इन इंडिया**" या संकल्पनेस अनुसरुन "**स्कील इंडिया**" या नावाने कौशल्य विकास या कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून, या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. या अनुषंगाने तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या "**मेक इन महाराष्ट्र**" या ध्येयास अनुसरुन राज्यात कौशल्य विकास अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक १५.०१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे रुपांतर करुन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत एकीकडे बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हे शासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे तर दुसरीकडे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया, स्वच्छ भारत, स्मार्ट शहरे, सांसद आदर्श ग्रामयोजना, प्रधानमंत्री जन धन योजना इत्यादी उपक्रमांना राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याने देखील विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण होत आहेत. याशिवाय सध्या राज्यात शासनाचे विविध विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील महामंडळे यांचे मार्फत विविध प्रवर्गातील लाभार्थींना वर नमूद विविध प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, यामध्ये समन्वयाचा अभाव असून एकसूत्रता नसल्यामुळे या योजनांच्या फलनिष्पत्तीची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध न होता या योजनांचे नियोजन, कार्यान्वयन, संनियंत्रण, मूल्यमापन इ. बाबींवर खर्च होणाऱ्या साधनांचा अचूक, किफायतशीर व प्रभावी वापर होत नव्हता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता राज्यातील मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करुन त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्धतेद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे, तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे एकात्मिकरित्या नियोजन व अंमलबजावणीतून "मेक इन इंडिया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यासारख्या संकल्पना साकार करुन आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करता यावे, यासाठी कौशल्य विकासासंबंधी सर्व समावेशक अभियान राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

वरील पार्श्वभूमीवर मा.पंतप्रधान यांच्या "स्कील इंडिया" या संकल्पनेस अनुसरून महाराष्ट्र राज्याने "**कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र**" हे ध्येय समोर ठेवले असून, राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी "प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यात येत आहे.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाअंतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर खालील संस्था कार्यान्वीत आहेत.

**प्रशिक्षण शाखा**

१. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET)
२. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ (MSSDB)
३. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (MSCVT)
४. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS)

**रोजगार शाखा**

५. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय

**उद्योजकता शाखा**

६. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी